'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal | Impact Factor (SJIF) – 6.261 | October-November-December 2018
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143 | Vol. 5, Issue 4

Impact Factor – 6.261

ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

October-November-December-2018

Vol. 5 Issue 4

**Chief Editor**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher

Price : Rs. 1000/-

ISSN : 2348-7143
Vol. 5, Issue 4


| | | | |
|---|---|---|---|
| 61 | आचार्य सत्यनारायण गोयंका के साहित्य में प्रतिबीम्बित भगवान बुद्ध का नारी विषयक दृष्टीकोन | अंजना सोनवणे | 268 |
| 62 | साक्री तालुक्यात विविध- सण उत्सवावेळी सादर केले जाणारे अभिनयसंपन्न लोकनाट्य:लळीत | डॉ. प्रकाश साळुंखे | 275 |
| 63 | कौटिलीय अर्थशास्त्र : पीक नियोजन व जल व्यवस्थापन | शिरीष अमृतकर | 279 |
| 64 | रेशीम उद्योगातून मिळणारे उत्पन्न आणि रोजगार | डॉ. शशांक पोळ व भाऊसाहेब दरेकर | 284 |
| 65 | कालिदासाच्या साहित्यातील मानवी सूक्ष्म भाव भावनांचे दर्शन | प्रा.श्रीमती बकुल कांबळे | 289 |
| 66 | भारतातील कुटुंब कल्याण कार्यक्रमाचा आढावा | डॉ. कल्याण मोरे व प्रा.अरविंद पाटील | 299 |
| 67 | कृषी साहित्यातील समस्या | शिरीष अमृतकर | 303 |
| 68 | यावल तालुक्यातील उच्च माध्यमिक शिक्षकांच्या व्यावसायिक कार्यसमाधनाचा अभ्यास | डॉ.प्रतिभा सूर्यवंशी | 310 |
| 69 | पांडुरंग नथुजी राजभोज व मंदिर सत्याग्रह चळवळ विशेष अभ्यास : पर्वती मंदिर सत्याग्रह | डॉ.राजकुमार सुरवसे | 314 |
| 70 | प्रिया तेंडूलकर यांच्या कथेतील स्त्रीवादी विचारसरणी | डॉ.वैशाली झोडे | 317 |
| 71 | १९९० नंतरचे ग्रामीण जीवनाचे प्रश्न आणि सदानंद देशमुख यांचे कादंबरी लेखन | डॉ.माणिक बागले | 319 |
| 72 | प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या भौगोलिक संकल्पनांच्या आकलनासाठी बुध्दीमंथन तंत्राच्या परिणामकारकतेचा अभ्यास | डॉ.वंदना चौधरी | 323 |
| 73 | लोकसाहित्यातील ओवीतून कुटुंब चित्रण | डॉ. स्वाती वाकोडे | 327 |
| 74 | भगवान बुद्धाचे वास्तववादी अर्थशास्त्र | डॉ.मनोजकुमार भोवते | 332 |
| 75 | शेतकरी वेदनेची गाथा:बारोमास | डॉ. मधुकर बैकरे | 335 |
| 76 | प्रा.मधू जामकरांच्या ललित लेखनातून काव्यात्मकता | डॉ.आर.बी.धायगुडे | 340 |
| 77 | गोविंदाग्रज ह्यांच्या गुढगुंजनात्मक कविता एक चिंतन | प्रा.अमृता डोरलीकर | 343 |
| 78 | भटक्यांच्या स्वकथनातून व्यक्त होणारा परिवर्तनाचा वेध | डॉ.ईश्वर सोमनाथे | 348 |
| 79 | मध्ययुगीन महाराष्ट्रातील संतमहिलांची वाटचाल एक विश्लेषण | स्वाती बदामे व डॉ.शिवाजी पवार | 351 |
| 80 | श्रीनिवास कुलकर्णी यांच्या ललीत लेखनातील प्रादेशिकता व निसर्गचिंतन | डॉ.राजाभाऊ धायगुडे | 355 |
| 81 | चंद्रकांत महामिने यांच्या विनोदी कथा संग्रहाचा अभ्यास | प्रा. मनीषा गुंडगळ (चव्हाण) | 359 |
| 82 | झाडीमंडळाचे साहित्यिक, सांस्कृतिक, सामाजिक वाङ्मयीन चळवळीचे योगदान | डॉ.धनराज ल. खानोरकर | 365 |
| 83 | विनोबांचे राजकीय वर्गीकरण व लोकशाही विषयक विचार | डॉ. दीपक लोणकर | 370 |
| 84 | गुंतवळ | डॉ. अंजली मुकुंद पांडे | 374 |
| 85 | अमरावती विभागातील आदिवासी आश्रमशाळांमधील शिक्षकांच्या सर्जनशीलतेचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनावर होणारा परिणाम – एक अभ्यास | विठ्ठल होनाळे, डॉ. मोहन खताळ | 377 |
| 86 | ग्रामीण साहित्य प्रेरणा | डॉ.गोवर्धन मुळक | 381 |
| 87 | वारी : ऐक्य जीवा-शिवाचे | डॉ. संतोष देशमुख | 386 |
| 88 | लोकसंस्कृतीचा प्रतिनिधी – वासुदेव व त्याची लोककथागीते | डॉ. रामकिशन दहिफळे | 390 |
| 89 | वारकरी संप्रदाय : समाजप्रबोधनाचे माध्यम | डॉ.अशोक लिंबेकर | 394 |
| 90 | पर्यटनाचा पर्यावरणावर होणारा परिणाम | प्रा. प्रकाश काळवणे | 397 |
| 91 | स्त्री-भ्रुणहत्या: परिणाम आणि उपाय | डॉ.साईनाथ बनसोडे | 400 |

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal | ISSN : 2348-7143
UGC Approved Journal | Impact Factor - (SJIF) - 6.261 | October-November-December 2018 | Vol. 5, Issue 4

# मध्ययुगीन महाराष्ट्रातील संतमहिलांची वाटचाल:एक विश्लेषण

संशोधक,
स्वाती निवृत्ती बदामे,
एम ए , बी एड., एम फील ,सेट,
पीएच डी. संशोधक इतिहास विभाग,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
नांदेड

मार्गदर्शक,
डॉ शिवाजी पवार,
एम. ए., पीएच. डी. इतिहास विभाग,
दिगंबरराव बिंदू महाविद्यालय,
भोकर जि. नांदेड

## प्रास्ताविक –

मध्ययुगीन काळ हा तेराव्या शतकापासून ते सतराव्या शतकापर्यंतचा काळ मानला जातो. या काळात जे विविध संत झाले या संतांच्या मालिकेत महिला संतांचा सिंहाचा वाटा आहे. तत्कालीन समाजात स्त्रीयांचे स्थान दुय्यम होते. कित्येक वेळा शुद्रांबरोबर स्त्रीचा उल्लेख येतो यावरून तिचा सामाजिक दर्जा लक्षात येतो. समाजात स्त्रियांना कोणतीच प्रतिष्ठा नव्हती. सर्व ध्येय इच्छा, आकांक्षा चार भिंतीच्या आत बांधलेल्या होत्या चुल आणि मुल हेच तिचे कार्यक्षेत्र होते. अशा प्रतिकूल परिस्थितीत दारिद्रय, सामजिक कुंचबणा, कौटुंबिक छळ या सगळया गोष्टी सहन करून या संत महिलांनी स्वत:चे अलौकीक स्थान निर्माण केले आहे. अर्थात यामागची प्रेरणा किंवा प्रेरक शक्ति संतांची आहे हे मान्य करायला हवे. ज्ञानेश्वरांदी संतांनी महाराष्ट्रामध्ये संतचळवळीची मुहूर्तमेढ रोवली त्यांनी सर्वसामान्यांना अध्यात्माचे भांडार खुले करून दिले. मध्ययुगीन महाराष्ट्रात शैव, शाक्त, नाथ, वैष्णव, महानुभाव, दत्त, रामदासी असे अनेक संप्रदाय उदयास आले होते.[१] या विविध संप्रदायाच्या माध्यमातून संतचळवळ संपूर्ण भारतभर पसरली व या संतचळवळीतूनच मध्ययुगीन महिला संताना पोषक वातावरण मिळाले व चुल आणि मूल यातून बाहेर पडून भक्तिमार्गाव्दारे त्या आध्यात्मिक काव्य करू लागल्या. विशेषत: महाराष्ट्रातील विविध संप्रदायापैकी महानुभाव, वारकरी व समर्थ संप्रदायातील संतमहिलांनी विविध प्रकारचे लेखन करून महाराष्ट्र सारस्वतात आपला ठसा उमटविला आहे.[२] या संप्रदायाच्या सामाजिक व धार्मिक कामगिरीचाच एक परिणाम म्हणून स्त्रिया हया पुरूषासोबत भक्तिमार्गाच्या वाटचालीत सहभागी झाल्या[३] व यातूनच पुढे महदाइसा किंवा महदंबा, मुक्ताबाई, जनाबाई, सोयराबाई, निर्मळाबाई, वेणाबाई, कान्होपात्रा व बहिणाबाई अशा कितीतरी संतमहिलांचा उदय झाला.

## संत महदंबा / महदाइसा :–

महदंबा किंवा महदाइसा ही मराठी मधील आद्य कवयत्री म्हणून समजली जाते. तीचे मुळ नाव रूपाई नागदेवाची चुलत बहिण होती. बुध्दिने तल्लख अशी विदूषी होती. तिचे व्यक्तिमत्व हे कालसंपन्न होते. तीला वैधव्य आल्यानंतर ती "पाईका" प्रमाणे राहु लागली तीने आपले सर्व आयुष्य सत्पुरूषांची सेवा व तीर्थयात्रा करण्यात व्यतीत केले. चक्रधर व गोविंदप्रभू यांचा निकटचा सहवास तिला लाभला तिने चक्रधरांच्या सानिध्यात असताना अनेक गोष्टी विचारल्या आहेत तिने केलेली प्रश्नोत्तरे व चर्चा यावरून चक्रधरांनी "म्हातारी जीज्ञासक! म्हातारी चर्चक! म्हातारी एथ काही पूसतचि असे"[४] अशी तिची स्तुती केली आहे महदंबेची धवळे व मातकी रूक्मिणी स्वयंवर ही मराठीतील पहिलीर कथाकाव्य होत. धवळे हे एक कथा काव्य आहे. धवळे हे महदाईसा आणि चक्रधर यांच्या संवादातून सिदध झालेले श्रीकृष्णचरित्र आहे. महदंबेच्या धवळयांच्या जन्माचा उल्लेख

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal | ISSN : 2348-7143
UGC Approved Journal Impact Factor (SJIF) - 6.261
October-November-December 2018 | Vol. 5, Issue 4

"गोविंदप्रभुचरित्रात" आढळतो. शीघ्र व उत्स्फूर्त कवीत्व हा महदबेचा खास गुण होता तिचा मृत्यू नवगाव(हैद्राबाद) येथे झाल्याची माहिती मिळते

संत मुक्ताबाई –

निवृत्ती–ज्ञानदेवापेक्षा वयाने लहान असलेली पण सतमंडळात मोठे स्थान व अधिकार असलेली मुक्ताबाई ही सतमहिला आहे पढरीमहत्म्य, नाममहत्म्य व सतसमागम या विषयावर तिची अभग रचना आहे ज्ञानदेव निराश होऊन ताटी लावून बसले असता त्याना उद्देशून मुक्ताबाईने जे अभग म्हटले आहे ते ताटीचे अभग म्हणून प्रसिध्द आहेत मजवरी दया करा। ताटी उघडा ज्ञानेश्वरा।।[६] असे तिच्या मनातले सारे अर्त व भाव या अभगात व्यक्त झाले आहेत. मुक्ताबाईचे गाथेतील तीन, हरिपाठाचे बारा आणि ताटीचे अभंग असे मिळून सरासरी पन्नास अभंग प्रसिध्द आहेत.

संत जनाबाई –

आई–वडिलांशिवाय पोरकी असणारी नामदेवाच्या घरात दासी म्हणून राहणारी एक सामान्य स्त्री "संत" या पदाला येऊन पोहचली. जनाबाईचा जन्म परभणी जिल्ह्यात गंगाखेड या गावी पिता दमा व आई करूड ह्यांच्या पोटी झाला. लहाणपणापासूनच जनाबाई नामदेवाच्या घरी राहिल्या होत्या. त्यामुळे त्या स्वत चा उल्लेख "नामयाची दासी जनी"[७] असा करतात. नामदेवाच्या सहवासात राहिल्याने जनाबाईला विठ्ठलभक्तिचा सोपा पांडुरंगनामाचा जय हेच आपले महातप आहे असा मार्ग त्यांनी सांगितला. "सर्व सुखाचे आगर। उभा असे विटेवर।। असे परमात्म्याचे वर्णन जनाबाई करतात जनाबाईचा विश्वास होता. ज्ञानदेव–नामदेव या सारख्या संताच्या सहवासात राहून जनाबाईने विपूल काव्यरचना केली. जनाबाईचे साडेतीनशे अभंग गाथेत उपलब्ध आहेत. कृष्णजन्म, थालीपाक, प्रल्हादचरित्र, बाळक्रीडा, द्रोपदीस्वयंवर, हरिश्चंद्रख्यान इ. आख्याने संत जनाबाईने रचली. स्त्रीमनाचा हळूवारपणा आणि भक्तिची सत उत्कटता त्यांच्या सर्व अभंगामध्ये ओथंबलेली दिसते.

संत सोयराबाई –

संत सोयराबाई ह्या संत चोखोबा यांच्या पत्नी आहेत. कर्ममेळा हा त्यांचा मुलगा व बंका महार हा त्यांचा भाऊ आहे. त्यांना त्यांच्या कुटुंबाविषयी अभिमान वाटतो. संत सोयराबाईच्या विविध अभंगातून त्या वेळच्या सामाजिक परिस्थितीची जाणीव होते. आपल्या नवऱ्याला समाजाकडून त्रास सोसावा लागला. पंढरीच्या ब्राम्हणांनी चोखोबाचा छळ केला; पण पांडुरंगाने कशा प्रकारे त्यांच्यावर कृपा केली हे त्यांनी आपल्या अभंगातून सांगितले आहे. संत सोयराबाईचे संताची अभंगवाणीत ६२ अभंग आले आहेत.[८]

संत निर्मळा –

संत चोखामेळा यांची निर्मळा ही लहान बहिण व संत बंकामहार यांची पत्नी तसेच सोयराबाईची नणंद होत्या. निर्मळा मेहूणपूर नावाच्या गावाला राहत होती. सकल संत गाथेत निर्मळेचे २४ अभंग आहेत. ती आपले वडिल बंधू चोखामेळा यानांच गुरुस्थानी मानते. निर्मळा ही चोखोबा व सोयराबाईकडे वाढली असल्यामुळे तिच्या व सोयराबाईच्या अभंगातील विचारात बरेच साम्य आढळते. आपल्या भावाला समाजात हिनयाती म्हणून हिनवले जाते. महाद्वाराबाहेर ठेवले जाते. तसेच सर्व कुटुंबियाचांही अशाच प्रकारे अपमान केला जातो. याची खंत निर्मळेच्या अभंगातुन प्रकर्षाने जाणवते. हीन दीन मी पातकाची राशी या शब्दात ती आपल्या हीनत्वाची जाणीव करुन देते

संत कान्होपात्रा –

संत कान्होपात्राचा काळ इ.सन १४६८(शके १३९०) असावा[९] कान्होपात्रा ही मुळची "मगळवेढा" येथील शामा गणिकेची कन्या होती. कोणत्याही पुरूषाला आपला देह विकण्यापेक्षा साक्षात पाडुरंगालाच तिने आपले

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261
UGC Approved Journal
October-November-December 2018
ISSN : 2348-7143
Vol. 5, Issue 4

तनमन वाहून टाकले होते गणिकेच्या भडक आणि विलासी जीवनाना त्याग करून तिने भक्तिमय जीवन स्विकारले आणि पांडुरंगाच्या चरणी स्वत:ला वाहून घेतले विषयत्याग करा आणि नामभक्ती करा असा उपदेश तिने आपल्या अनेक अभंगातून केला आहे "नको देवराया अंत आता पाहू। प्राण हा सर्वथा फुटो पाहे।।"[10] हा तिने केलेला धावा तिची असाहयता व शरणागती तर दाखवतोच पण तिच्या व्रतस्थ आणि उज्वल व्यक्तिमत्वाचे दर्शनही घडवतो कान्होपात्राचे अभंग म्हणजे तिच्या भावनांचा स्वच्छ बिलोरी आरसाच आहे[11] तसेच कान्होपात्राचे काव्य म्हणजे भक्ताच्या उत्कट अनुभूतीचा सात्विक अविष्कार आहे .

संत वेणाबाई–

रामदास संप्रदायातील एक प्रमुख संत महिला म्हणून संत वेणाबाई ओळखल्या जातात जन्म इ.स.न १६२७ (शके १५४९)कोल्हापूरला झाला. बालपणीचा वैधव्य प्राप्त झाले. वैधव्याचे दु:ख विसरण्यासाठी त्या रामभक्तिकडे वळल्या. रामभक्तीने रामायण व सीतास्वंयवर या ग्रंथामुळे वेणाबाई महाराष्ट्राला परिचित झाल्या सीतास्वयवर हा ग्रंथ ओवीबद्ध आहे. तो स्त्री स्वभाव मार्दव याने परिपूर्ण आहे १५६८ ओव्यांची ही कथा आहे. सामाजिक आणि कौटुंबिक विरोध स्विकारूण वेणाबाईने समर्थाचा आश्रय घेतला.एकदा कीर्तनानंतर गुरूनमन करतेवेळी इ.स. १६७८ ला त्याचा अंत झाला. वेणाबाईची ग्रंथरचना मर्यादीत स्वरूपाची असली तरी काव्याचे अनेक विशेष तिच्यामध्ये सापडतात.

संत बहिणाबाई–

संत महिला म्हटल्या की तुकाराम शिष्या बहिणाबाईचा उल्लेख प्रथमत: केला जातो.बहिणाबाईच्या ओव्या, पदे, आरती वगैरे मिळून ५८१ ओव्या एवढी कविता सामाविष्ट झाली आहे. त्यांची एकूण अभंगाची संख्या ७२९ आहे. बहिणाबाईचा जन्म शके १५५० मध्ये झाला. बालवयातच वयानं तीस वर्ष मोठ्या असणाऱ्या वयस्कर माणसाशी त्यांचे लग्न झाले बहिणाबाईच्या वडिलांनी लग्नासाठी काढलेले कर्ज न फेडताच वनवास स्विकारल्याने जावयाच्या सल्ल्यावरून बहिणाबाईच्या सर्व माहेरचे कुटूंब हे तिच्या पतीसह गाव सोडतात. त्यामुळे त्यांना प्रवरासंगम, निरानरसिंहपूर, पंढरपूर, रहिमतपूर, कोल्हापूर, देहू अशा अनेक ठिकाणी वणवण भटकंती करावी लागते कोल्हापूरला असताना जयरामस्वामीच्या कीर्तनाचा त्यांना लाभ होतो. पुढे तुकाराम महाराजांचा गुरूपदेश त्यांनी स्विकारला हा उपदेश तुकाराम महाराजांनी त्यांना स्वप्नात दिला त्यामुळे आत्मसाक्षात्कार झाल्याने लोक दर्शनास येऊ लागले पत्नीची वाढती लोकप्रियता पतिला सहन झाली नाही व त्याने तिचा तिरस्कार केला. बहिणाबाईची अध्यात्मिक वाटचाल लक्षात घेता बहिणाबाईना कुटुंबाचा, पतीचा, समाजाचा जाच सहन करावा लागला आहे बहिणाबाईनी प्रपंच करून परमार्थ साधला व भागवत मंदिरावरचा पताका हाती घेण्याचे कार्य केले.

मध्ययुगीन काळात संतसाहित्याच्या क्षेत्रात ज्या स्त्रिया होऊन गेल्या त्यांनी "स्व" च्या शोधासाठी जीवाचे रान केले. महदंबा, मुक्ताबाई, जनाबाई, सोयराबाई, निर्मळा, वेणाबाई, कान्होपात्रा, बहिणाबाई यांनी काव्यनिर्मीती करून समाजात वैशिष्टपूर्ण स्थान निर्माण केले. महदंब व वेणाबाई बालविधवा होत्या, मुक्ताबाई व जनाबाई अविवाहित होत्या, बहिणाबाईचा विषम विवाह झाला होता. कान्होपात्रा ही गणिका होती. निर्मळ व सोयरा ह्या विवाहीत होत्या. संत महिलांचे लौकीक जीवन अभ्यासताना त्यांचे वैवाहिक जीवनाचा, वातावरणाचा, परिसराचा, कुटूंबाचा परिणाम संतमहिलांच्या व्यक्तिमत्वावर झालेला दिसून येतो व ते अभंगातून स्पष्ट दिसून येते या महिलांनी आपल्या जीवनाची वाटचाल नामाच्या बळावर केली व श्रमातून भगवताची प्राप्ती करून घेतली त्यामुळे परमार्थाची वाटचाल यशस्वीरित्या पार पाडली.

'RESEARCH JOURNEY' International E Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF) - 6.261
UGC Approved Journal | October-November-December 2018 | Vol. 5, Issue 4

एकदरीत पाहता तेराव्या शतकापासून सतराव्या शतकापर्यंत सर्वच संतानी धर्माच्या माध्यमातून समाजोन्नतीचे कार्य केले विशेषत महिला संतानी केलेली संतसाहित्य निर्मितीची कामगिरी ही उल्लेखनिय ठरते सगळ्यात स्त्री संताना समाजाचा छळ सोसावा लागला पण त्याच्या आध्यात्मिक आत्मबदलामुळे त्यानी विजय मिळविला व भक्तिमार्ग अभंगरचना करून समाजप्रबोधनाच्या कार्यात पुढाकार घेऊन परिवर्तनाला एक नवे वळण दिले

संदर्भसुची

१. भवाळकर तारा – स्त्री मुक्तीचा आत्मस्वर मुबई, दृितीय आवृत्ती सप्टेंबर २०१२, पृ–१५
२. डॉ.पठाण यु.म. :– मध्ययुगीन मराठी संत साहित्य काही आयाम, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद २००३, पृ ६०
३. इनामदार हे.वि.:– खुले विलास (संपा) :– भक्तिगंगेच्या वाटेवर, पुणे प्रथमावृत्ती १९८८, पृ–३
४. कोलते वि.भि:– म्हाइंभट संकलित लीळाचरित्र, मराठी साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई १९७८, उन्तरार्ध लीळा क्र ४९१
५. डॉ.पठाण यु.म. :– पूर्वोक्त, पृ ६१–६२
६. नसिराबादकर ल.रा. :– प्राचीन मराठी वाङ:मयाचा इतिहास, फडके प्रकाशन, प्रथमावृत्ती – पृ – ८०
७. इनामदार हे.वी. :– खुले विलास, पूर्वोक्त पृ–५४
८. भोसले एस.एस.व मोहरीर ल.का. :– संतांची अभंगवाणी, किर्ती प्रकाशन, प्रथमावृत्ती – पृ–८८
९. अजगांवकर ज.र. :– महार संत कवियत्री भारत गौरव ग्रंथमाला १९३९, पृ–७९
१०.नसिराबादकर ल.रा. :– पूर्वोक्त . पृ–९२
११.ग्रामोपाध्ये गं.बं. :– संतकाव्य समालोचन, चित्रशाळा प्रेस १९४९. पृ–१९६.